# मानीव खरेदीखताची प्रक्रीया

## [PROCESS OF DEEMED CONVEYANCE]

अ. **मानीव खरेदीखतासाठी [Deemed Conveyance] सहकारी गृहरचना संस्था कडून** करावयाची सर्वसाधारण कार्यपध्दत पुढीलप्रमाणे आहे.

1. मोफा कायदयाअंतर्गत, शासनाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकारी [Deputy District Registrar/Joint Registrar, Co-operative Society ] यांचेकडे एकतर्फी खरेदीखत म्हणजे मानीव खरेदीखत त्यांचे लाभात करुन मिळणेसाठी अर्ज करणे
2. या अर्जाचे अनुषंगाने, सक्षम प्राधिकारी उचित चौकशी करुन उक्त संस्था, कंपनी किंवा असोशिएशन यांचे लाभात मानीव खरेदीखत करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र व आदेश निर्गमित केल्यानंतर मानीव खरेदीखताचा मसुदा सक्षम प्राधिकारी यांचेकडे सादर करणे
3. खरेदीखताचा मसुदा सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केल्यानंतर, उक्त खरेदीखत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार, संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडे अभिनिर्णयासाठी [ देय मुद्रांक शुल्क ठरविण्याकरिता ] सादर करणे
4. मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार मुद्रांक शुल्क भरल्यास मुद्रांक जिल्हाधिकारी खरेदीखतावर यथोचित मुद्रांक शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र दिल्यांनतर
5. अशा योग्य मुद्रांकीत खरेदीखतावर सक्षम प्राधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी लिहून देणार तर संबंधित संस्था लिहून घेणार यांनी सहया करणे.
6. उभय पक्षकारांचे सहीनंतर असे खरेदीखत संबंधित संस्था संबंधित दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी करणेसाठी हजर करणे.

ब. मानीव खरेदीखतासाठी [Deemed Conveyance] दुय्यम निबंधका कडून करावयाची सर्वसाधारण कार्यपध्दत पुढीलप्रमाणे आहे

1.विहीत मुद्रांकीत व निष्पादीत केलेला दस्त व त्याबरोबर आवश्यक असलेली कागदपत्रे जोडल्यास असा दस्त नोंदणीस दाखल करुन घेणे.

2.दस्त हजर करणा-या पक्षकाराकडून आवश्यक नोंदणी फी वसूल करणे

3. दस्त हजर करणा-या पक्षकाराच्या नावाने वसूल केलेल्या नोंदणी फी ची देणे

4.सर्व निष्पादक पक्षकारांचे (दस्त लिहून देणार वगळता ) कबुलीजबाब नोंदविणे

(दस्त लिहून देणार हे शासन अधिकारी किंवा त्यांनी याकरीता प्रधिकृत केलेले प्रतिनिधी असल्याने त्यांना कबुलीजबाब देणेसाठी दुय्यम निबंधक कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट अस त्यांचे नावासमोर सूट असल्याचा शेरा नमूद करणे )

5. दस्त लिहून घेणार यांची ओळख पटवित असलेल्या दोन ओळखदार यांची ओळख घेणे

6.दस्त नोंदणी पूर्ण करून, त्याचे स्कनिग पूर्ण करणे

7.मूळ दस्त,थंबनेल प्रींट,सीडी व सूची क्र.2 दस्त हजरकर्ता यांना देणे